मंगळवार, दि. २२ एप्रिल २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २५८ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अॅण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### शिवसेना दलित आघाडीचे आंदोलन; भुमिहिनांची उपस्थिती

## रखरखत्या उन्हात जनआक्रोश

**जालना । प्रतिनिधी -** शिवसेना दलित आघाडीच्या वतीने जिल्हाधिकारी जालना कार्यालयासमोर दलित आदिवासी भूमीन कास्त पट्टे नावे करून सातबारा मिळण्याबाबत व इतर मागण्या संदर्भात दलित आदिवासी नेते तथा शिवसेना दलित आघाडी जिल्हाप्रमुख अॅड.भास्करराव मगरे यांच्या नेतृत्वात जन आक्रोश आंदोलन तसेच न्यायप्रविष्ठ प्रकरणातील जैनपूर कोठार दलित आदिवासी कास्ट पट्टे जिल्हा प्रशासनाकडून अत्याचार व बेदखल केल्याप्रकरणी आज अंबड चौफुलीपासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला होता. दरम्यान यावेळी प्रचंड उन्हात भुमिहिन गायरानधारकांची तोबा गर्दी होती.

जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना देण्यात आलेल्या निवेदनात शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख अॅड. भास्करराव मगरे यांनी म्हटले आहे की, शिवसेना दलित आघाडीच्या वतीने भुमिहिन बेघर, जिल्हा स्तरावर सौरऊर्जे चा प्रकल्प दलित आदिवासी कास्त पट्टे न्याय प्रविष्ट असताना बळजबरी ताब्यात घेत असल्याचे प्रशासनाच्या विरोधात तसेच जेनपुर (कोठारा) येथील जालना वरिष्ठ न्यायालयात न्यायप्रविष्ट असताना भोकरदन पोलिस ठाण्यामार्फत ताबा करुन भुमिहिनांचा घरे पाडून निर्वासित केले आहे. त्या विरोधात आज शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख अॅड. भास्करराव मगरे यांच्या मार्गदर्शनाखाली अति विराट जनआक्रोश मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात आला होता. दलित आदिवासी भूमिहीन बेघर निराधार यांच्या न्याय हक्कासाठी व तसेच जिल्हा स्तरावर सौऊर्जे चा प्रकल्प दलित आदिवासी कास्त पट्टे न्याय प्रविष्ट असताना बळजबरी ताब्यात घेत असल्याचे प्रशासनाचे विरोधात तसेच जेनपुर (कोठारा) येथील जालना वरिष्ठ न्यायालयात न्यायप्रविष्ट असताना भोकरदन पोलिस ठाण्यामार्फत ताबा करून स्थानिक दलित आदिवासी भूमिहीन कास्तकरांचे कोंबड्या, बकर्या, घरे पाडून निर्वासित केले आहे. त्यामुळे या दलित दलित आदिवासी भुमि



हिनांना न्याय देण्यात यावा.

शासन निर्णयाची अंमलबजावणी न करता दलित आदिवासी भूमीन कास्तकारांना वेधखल करण्याची धमकी देऊन शासकीय प्रकल्पाच्या नावाखाली दलित आदिवासी भूमीहीन कास्तकरांचा छळ केल्या जात आहे पोलिसान मार्फत दलित आदिवासी भूमी यांच्या जमिनी काढून घेण्यात येत आहेत. वेळप्रसंगी अमानुष मारहाणी होत आहे हे कुठेतरी शासनाने थांबवायला पाहिजे. दलित आदिवासी भूमीन कास्तकार कायदेशीर मार्गाने प्रकरणे न्याय प्रविष्ट असताना कसले प्रकारचे चौकशी न करता व नोटीस न देता पोलीस बाळाचा वापर करून दलित आदिवासींना त्रास दिल्या जातो. आता उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे त्यांना निवारा देखील नाही काही महिन्यात पावसाळा सुरू होणार आहे. तेव्हा मौजे जयपूर कोठारी येथील दलित आदिवासी भूमिहीन कास्तकारांनी राहायचे कुठे आणि खायचे काय हा प्रश्न निर्माण झाला आहे आणि म्हणून या प्रश्नावर मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी हा विषय गांभीर्याने घेऊन मौजे जैनपूर कोठारा येथील न्याय प्रविष्ट प्रकरणात **पान २ वर**

सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव

## अधिकाधिक हिंदूंना संघटित करा ! - योगी आदित्यनाथ



**लखनऊ । प्रतिनिधी -** सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांचा ८३ वा जन्मोत्सव आणि सनातन संस्थेचे रौप्य महोत्सवी वर्ष यानिमित्ताने गोवा येथे १७ ते १९ मे २०२५ या कालावधीत होणार्या भव्य 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'चे निमंत्रण आज 'गोरक्षपीठ पीठाधीश्वर' तथा उत्तर प्रदेश राज्याचे मुख्यमंत्री श्री. योगी आदित्यनाथ महाराज यांना देण्यात आले.

या वेळी 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'च्या 'स्वागत समिती'तील सद्गुरु (डॉ.) चारुदत्त पिंगळे, जौनपूर, मडियाहू विधानसभा क्षेत्राचे आमदार श्री. रविंद्रकुमार पटेल आणि श्री. विश्वनाथ कुलकर्णी यांनी उत्तर प्रदेश राज्यातील लखनऊ येथील मुख्यमंत्री कार्यालयात श्री. योगी आदित्यनाथ महाराज यांची भेट घेतली.

या वेळी प्रथम सनातन संस्थेच्या २५ वर्षांतील कार्याविषयी मुख्यमंत्र्यांना माहिती देण्यात आली. सनातन संस्थेचे कार्य ऐकल्यावर उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री श्री. योगी आदित्यनाथ महाराज म्हणाले की, सनातन संस्थेचे चांगले कार्य चालू आहे. या कार्याबद्दल तुमचे अभिनंदन ! सध्या हिंदूंमध्ये फूट पाडण्याचे मोठ्या प्रमाणावर प्रयत्न चालू **पान २ वर**

युवा आदर्श

### कुटाणा ...

**भाऊबंदकी मिटावी**
**परत करतो कुटाणा**
**नवीन कवळी बसली**
**फोडू पाहतो वाटाणा**
**मध्ये खौट शेंगदाणा**
**आडे सडला फुटाणा**
**किती वेळा हाकाली**
**जारे बाबांनो फुटा ना**
**दिल्लीवारी फुकटची**
**भोके पडलीयं बुटांना**
**नेमकी चुकवी दिशा**
**काय झालेय वाटांना**
**नवीन चुना लिंपतोयं**
**रे भुसभुशीत विटांना**
**झिरपू गेले गोडपाणी**
**छिद्रे मोठाली माठांना**
**भाषणे करुन कंटाळे**
**कोरड पडते ओठांना**
**मते देताना विसरतात**
**का समजेना थोटांना**
**मधात बुचकाळे हात**
**मध माशांनो चाटाना**
**दूरध्वनी रे शंखध्वनी**
**समोरा समोर भेटाना**
**वाटून वाटून संपल्या**
**असंख्यवाटा नोटांना**
**चिन्ह आमचे दाबता**
**का धाड भरे बोटांना**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात आगामी सण, उत्सवात शहरातील मिरवणुका व विविध कार्यक्रम आणि आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये जालना जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत दि.२ मे २०२५ पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी करण्यात आली आहे, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी गणेश महाडिक यांनी जारी केले आहेत.

संपूर्ण जालना जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश दि. २ मे २०२५ रोजीच्या २४ वाजेपर्यंत लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत बाळगता येणार नाही. व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक **पान २ वर**

## सातव्या वेतन आयोग; वरिष्ठ वेतन श्रेणी त्रुटी दूर करण्यासाठी शिक्षकांचा मुख्यमंत्री व प्रधान सचिवांना पत्र व्यवहार!

**दत्ता देशमुख**

**टेंभूर्णी -** राज्यातील शिक्षकांना २०१६ मध्ये सातवा वेतन आयोग लागू झाला.त्यात वरिष्ठ वेतन श्रेणी देत असताना अनेक त्रुटी राहिल्या. सामान्य शिक्षकांना एकूण सेवा काळात पदोन्नतीच्या संधी नसल्याने बारा वर्षांनंतर वरिष्ठ वेतन श्रेणी लागू होते.



२००४ नंतर नियुक्त शिकानांना ही वाढ अगदी तुटपुंजी आहे. तसेच दीं.२७ डिसेंबर २०२२ ला विधिमंडळात शासनाने यात त्रुटी असून वरिष्ठ वेतन श्रेणीचा लाभ नष्ट झाल्याचे मान्यही केलं होत पण त्यानुसार निर्णय होत नव्हता म्हणून या संदर्भात राज्य वेतन त्रुटी कृती समितीच्या माध्यमातून राज्यातील शिक्षकांनी न्यायालयात धाव घेतली होती त्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने निर्णय देताना वेतन त्रुटी निवारण समितीची स्थापना करून सहा महिन्यात योग्य निर्णय घेऊन शिक्षकांना न्याय द्यावा असा निर्णय दिला.


दरम्यान शासनाने मा.मुकेश खुल्लर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली.सदरील समितीने अभ्यास करून आपला अहवाल शासनास सादर केला परंतु शासनाकडून अद्यापही काही कार्यवाही होत नाही.म्हणून कृती समितीमधील राज्यातील सर्व शिक्षक मा. मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस साहेब व प्रधान सचिव यांना पत्र लिहून वेतन त्रुटी दूर करण्यासाठी विनंती करणार आहेत.

सदरील पत्र व्यवहार हा दी.२१ एप्रिल ते २५ एप्रिल २०२५ पर्यंत करण्यात **पान २ वर**

## उन्हाळ्यात उष्मालाटेपासून बचावासाठी काळजी घेण्याचे जिल्हा प्रशासनाचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** उष्माघात ही उन्हाळ्यातील एक सामान्य समस्या आहे. ही समस्या तीव्र सूर्यप्रकाश किंवा उष्णतेच्या दीर्घकाळापर्यंत संपर्कात राहिल्यामुळे होऊ शकते उन्हाळी हंगामातील उष्मालाटेमुळे उदभवणाऱ्या उष्माघातांनी मानव, पशु- प्राणी व शेती पिकांवर होणारे दुष्परिणाम टाळण्याच्या दृष्टीने उन्हाळ्यामध्ये नागरिकांनी उष्मालाटेपासून बचाव होण्याच्या दृष्टीने योग्य ती दक्षता घ्यावी, असे आवाहन प्र.निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी नम्रता चाटे यांनी केले आहे.

उष्मालाटेपासून बचावासाठी पुरेसे पाणी प्यावे, तहान लागली नसली तरीही दर अर्ध्या तासाच्या फरकाने पाणी प्यावे. घराबाहेर पडताना डोके झाकण्यासाठी छत्री अथवा टोपीचा वापर करावा. दुपारी १२ ते ३ वाजेदरम्यान घराबाहेर जाणे टाळावे. सूर्यप्रकाशापासून वाचण्यासाठी घरातील पडदे आणि झडपांचा वापर करावा. उष्णतेच्या लाटेच्या माहितीसाठी रेडिओ, टीव्ही किंवा वर्तमानपत्रातील माहितीचा वापर करण्यात यावा. हलकी, पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरावेत. प्रवासात पिण्याचे पाणी सोबत ठेवावे. उन्हात काम करीत असल्यास टोपी, छत्री किंवा ओल्या कपड्याने डोके, मान, चेहरा झाकावा. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास ओआरएस, घरी बनवण्यात आलेली लस्सी, कैरीचे पन्हे, लिंबू-पाणी, ताक इत्यादीचा वापर नियमित करावा. अशक्तपणा, डोकेदुखी सतत



येणारा घाम इत्यादी उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखावीत व चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घेण्यात यावा. गुरांना छावणीत ठेवण्यात यावे तसेच त्यांना पुरेसे पाणी पिण्यास देण्यात यावे. घर थंड ठेवण्यासाठी पडदे, शटर व सनशेडचा वापर करण्यात यावा. तसेच रात्री खिडक्या उघड्या ठेवाव्यात. पंखे, ओले कपडे याचा वापर करण्यात यावा. तसेच थंड पाण्याने वेळोवेळी स्नान करण्यात यावे. कामाच्या ठिकाणी जवळच थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी. सूर्यप्रकाशाचा थेट संबंध टाळण्यासाठी कामगारांना सूचित करण्यात यावे. पहाटेच्या वेळी जास्त कामाचा निपटारा करण्यात यावा. तसेच बाहेर कामकाज करीत असल्यास मध्ये-मध्ये विश्रांती घेऊन नियमित आराम करावा. गरोदर स्त्रिया आणि आजारी कामगारांची अधिक काळजी घेण्यात यावी.

उन्हात अतिकष्टाची कामे करू नका. दारू, चहा, कॉफी आणि कार्बोनेटेड थंड पेये घेऊ नका. दुपारी १२ ते ३ च्या दरम्यान घराबाहेर जाणे टाळावे. उच्च प्रथिनयुक्त आणि शिळे अन्न खाऊ नका. लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेवू नये. गडद, घट्ट व जाड कपडे घालण्याचे टाळावे. बाहेर तापमान जास्त असल्यास शारीरिक श्रमाची कामे टाळावी. उन्हाच्या कालावधीत स्वयंपाक करण्याचे टाळावे, तसेच मोकळ्या हवेसाठी स्वयंपाक घराची दारे व खिडक्या उघडी ठेवावीत. अशा सुचनाही जिल्हा प्रशासनाने दिल्या आहेत.

## ए प्लस खेळाडूंमध्ये बुमराह, जडेजा व कोहलीसह रोहीत

**नवी दिल्ली -** बीसीसीआयने अखेर केंद्रीय करार जाहीर केला. याची बऱ्याच दिवसांपासून वाट पाहिली जात होती, पण उशिरा का होईना, आता ही घोषणा करण्यात आली आहे. दरम्यान, बीसीसीआयने पुन्हा चार भारतीय खेळाडूंना ए प्लस ग्रेडमध्ये स्थान दिले आहे. यामध्ये रोहित शर्मा, विराट कोहली, जसप्रीत बुमराह आणि रवींद्र जडेजा यांची नावे आहेत. बीसीसीआयच्या या घोषणेनंतर, आता हे निश्चित झाले आहे की रोहित शर्मा सध्या कुठेही जाणार नाही.

गेल्या वर्षी जेव्हा भारतीय क्रिकेट संघ पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी ऑस्ट्रेलियाला गेला होता, तेव्हा रोहित शर्मा त्याच्या फॉर्मशी संघर्ष करत असल्याचे दिसून आले. त्या मालिकेत संघाची कामगिरीही फारशी खास नव्हती. परिस्थिती इतकी टोकाला पोहोचली होती की रोहित शर्माला शेवटच्या कसोटीच्या अंतिम अकरामधून स्वतःला वगळावे लागले.

यानंतर, रोहित शर्मा आता कसोटी क्रिकेटमधून निवृत्त होणार असल्याची अटकळ सुरू झाली. त्याने आधीच टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. पण आता बीसीसीआयने केलेल्या **पान २ वर**

## संपादकीय

# बदलत्या हवामानाचा सर्व क्षेत्रांना फटका

बदलत्या हवामानाचा सर्वच क्षेत्रांना फटका बसत आहे. त्यातही कृषी क्षेत्रावर त्याचा जास्तच परिणाम होताना दिसत आहे. सध्या एप्रिल महिना चालू आहे. सर्वत्र कडाक्याचे ऊन जाणवत आहे. सर्वच शहरांचे तापमान ४० अंशाच्या घरात आहे. विदर्भातील काही भागात तर तापमान ४२ ते ४५ अंश सेल्सिअस नोंदवले जात आहे. तापमान वाढल्याने लोकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. कडाक्याच्या उन्हामुळे लोकांना अनेक आजार होत आहेत. या कडाक्याच्या उन्हात लोकांना चक्कर येणे, हृदय विकाराचा झटका येणे, रक्तदाब वाढणे, शरीरातील पाणी कमी होणे, डोळ्यांचे विकार जडणे, लहान मुलांचा घोळणा फुटणे, उष्माघात होणे असे प्रकार घडतात. उष्माघाताने काहींचा जीवही गेला आहे. दोन वर्षापूर्वी खारघर मध्ये घडलेली घटना अजूनही ताजीच आहे. उष्माघातामुळे महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्यात १५ श्री सेवेकरांना जीव गमवावा लागला होता. कडाक्याच्या उन्हात जास्तीतजास्त पाणी पिण्याचा सल्ला डॉक्टरांकडून दिला जात आहे. तसेच फळांचा ज्यूस सेवन करण्यास सांगितले जाते. डॉक्टरांकडून दुपारी ११ ते ४ घराबाहेर न पडण्याचा सल्ला दिला जातो मात्र पोटापाण्यासाठी लोकांना घराबाहेर पडावेच लागते. एकीकडे कडाक्याचे ऊन असताना राज्यातील काही भागात मात्र वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. पुढील काही दिवस देशातील काही भागात अवकाळी पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. अवकाळी पावसामुळे शेतीचे प्रचंड नुकसान होते. फळबागा जमीनदोस्त होतात. हातातोंडाशी आलेला घास हिरावला जातो. क्षणात होत्याचे नव्हते होते. वर्षभराच्या मेहनतीवर पाणी पडते. अवकाळी पाऊस झाला की बळीराजाच्या काळजाचा ठोका चुकतो. ऐन उन्हाळ्यात अवकाळी पाऊस पडणे ही गेल्या काही वर्षातील नित्याची बाब झाली आहे. जम्मू काश्मीर सारख्या निसर्गाच्या नंदनवनात काल निसर्गाने काल जो प्रकोप दाखवला तो पाहून सगळ्यांच्याच काळजाचा ठोका चुकला. जम्मू काश्मीरमध्ये ढगफुटी झाली. या ढगफुटीने जम्मू काश्मीरमध्ये हाहाकार उडाला. क्षणात संपूर्ण प्रदेश जलमय झाला. प्रचंड पाऊस आणि भूस्खलन झाल्याने तीन जनांना आपला जीव गमवावा लागला. या ढगफुटीने जम्मू काश्मीरमधील जनजीवन विस्कळित झाले. शेकडो लोकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करावे लागले. तिथे अजूनही बचावकार्य चालू आहे. ऐन उन्हाळ्यात निसर्गाने दाखवलेल्या या उग्र रूपाने सर्वजण आवाक झाले. जम्मू काश्मीरमध्ये अशा प्रकारचा पाऊस यापूर्वी पाहिला नव्हता असे तेथील जुने जाणते लोक सांगत आहेत. केवळ जम्मू काश्मीरच नाही तर देशातील अनेक राज्यात अशाप्रकारचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. ईशान्य आणि दक्षिणेकडील काही राज्यात विजेच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे. आसाम, मेघालय, अरुणाचल प्रदेशात २२ ते २४ तारखे दरम्यान अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे. झारखंड, ओडिशा, पश्चिम बंगाल, आणि छत्तीसगड मध्ये २० ते २४ दरम्यान मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे केरळ, कर्नाटक, लक्षद्वीप, आंध्रप्रदेश, तेलंगणा या दक्षिणेकडील राज्यातही पावसाची शक्यता वर्तवली आहे. म्हणजेच देशातील एका भागात कडाक्याचे उन तर दुसऱ्या भागात मुसळधार पाऊस अशी विषम परिस्थिती आहे. कडाक्याचे ऊन, अवकाळी पाऊस, गारपीट, चक्रीवादळ या घटना आताच घडतात असे नाही तर वर्षभर घडत असतात. महाराष्ट्र हे सह्याद्रीच्या कुशीत वसले आहे. पूर्वी सर्व ऋतूंचे आगमन वेळेवर होत होते. मागील काही वर्षात ऋतुमानात मोठे बदल पाहायला मिळत आहे. ऋतुमानच बदलले आहे. पूर्वी पाऊस फक्त पावसाळ्यातच पडत असे आता वर्षभर कोठेना कोठे पाऊस पडताना दिसतो. पावसाळ्यात दोन दोन महिने पाऊस पडत नाही. कधीकधी दोन दिवस इतका पाऊस पडतो की दोन दिवसात दोन महिन्याची सरासरी भरून काढतो. त्यामुळे कोणत्या ऋतूत कोणते पीक घ्यावे याबाबत शेतकरी संभ्रमात असतो. बदलत्या हवामानामुळे काहींनी शेती करणेच बंद केले आहे. राज्यात मागील काही वर्षात मोठ्या प्रमाणात जंगलतोड वाढली आहे. काँक्रीटीकरण वाढले आहे. शहरे सिमेंटचे जंगले बनली आहेत. पर्यावरणाचा ऱ्हास झाला आहे. त्यामुळे वातावरणात बदल होत आहे. वातावरणातील बदलामुळे या घटना घडत आहेत. निसर्गाच्या या बदलत्या चक्राचा मानवजातीवरच नाही तर संपूर्ण जीवसृष्टीवरच परिणाम होत आहे. लोकांनी यातून धडा घेऊन आतापासूनच निसर्ग नियमाने जगणे सुरू करायला हवे. वृक्षतोड थांबवली पाहिजे, जंगलतोड थांबवली पाहिजे. वृक्षलागवड करून ती जगवली पाहिजेत. माणसाने निसर्गावर केलेले आक्रमण थांबवले पाहिजे. जर माणसे निसर्ग नियमाच्या विरुद्ध गेले तर त्याची मोठी किंमत येणाऱ्या पिढीला मोजावी लागेल.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# सावधान! पृथ्वी मानवजाती के लिये मेहमान है!

पृथ्वीचा दीवसेंदीवस ह्रास होत आहे आणि यामुळे ऑक्सिजनची मात्रा सुध्दा कमी होत आहे ही घटना करोना महामारीच्या रूपाने आपण उघडल्या डोळ्यांनी पहाली. यामुळे जगात लाखोच्या संख्येने जिवीत हानी सुध्दा झाली.याकरीता पृथ्वीला वाचवाण्यासाठी सर्वांनी संकल्पकरण्याची गरज आहे.आज बदलत्या हवामानामुळे दिनांक २० एप्रिल २०२५ ला देशात नागपूरची सर्वात हॉट शहरांमध्ये नोंद करण्यात आली.कारण नागपूरचा पारा ४४.७ अंश डिग्री सेल्सियस ने संपूर्ण विदर्भ होरपळून निघाला.जगात पृथ्वी सुरक्षित रहावी या उद्देशाने १९७० पासून जागतिक पृथ्वी दीवससाजरा करण्यात येतो.प्लास्टीक पासुन होणारे प्रदुषण व पृथ्वीला निर्माण होणारा धोका यावर मोठ्या प्रमाणात कार्यक्रम राबविण्यात आले व अनेक देशांनी प्लास्टीक पासुन होणारे प्रदुषण टाळण्याचा प्रयत्न केला व अनेक देश प्लास्टीकच्या प्रदुषणापासुन मुक्त झाले.भारतानेही पृथ्वी संरक्षणासाठी व प्रदुषण दुर करण्यासाठी प्लास्टीकवर बंदी घातली आहे. सध्याच्या परीस्थितीत जगातील वाढती लोकसंख्या पृथ्वीतलावरील मोठे संकट आहे. यामुळे हवेतील ऑक्सिजनची मात्रा दिवसेंदिवस कमी होतांना दिसुन येते. कारण जगातील वाढत्या लोकसंख्येमुळे जंगलसंपदा छीन्न-विछीन्न झाल्याचे दीसुन येते व यामुळे हवामान अक्राळविक्राळ रूप धारण करीत आहे.त्याचप्रमाणे अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात मोठ्या प्रमाणात कारखाने दीसुन येतात.यामुळे संपूर्ण जगात स्थलप्रदुषण,वायुप्रदूषण व जलप्रदूषण मोठ्या प्रमाणात होतांना दिसते. कारखान्यांचा विस्तार जगातील सर्वच देशांनी वाढविला आहे. यामुळे पहीला प्रहार जंगलसंपत्तीवर केलेला आहे. मानवाच्या अतिरेकामुळे पृथ्वीतलावर भुकंप,ज्वालामुखीचा उद्रेक,सुनामी, महाप्रलय, महामारी,साथीचे रोग,अती पाउस,अती उष्णता,अती थंडी,वनवे लागने अशाप्रकारचे विनाशाकडे नेणाऱ्या घटना दीवसेंदीवस वाढतांना दीसत आहे. ह्या संपूर्ण घटना मानवाने पृथ्वीवर अत्याचार केल्यामुळे दीसुन येतात. २१ व्या शतकात मानव इतका सामोरं गेला आहे की अनेक टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून अत्याधुनिक हतियार,अनुबॉम्ब बनविण्याच्या शर्यती लागलेला आहेत.आतातर बायोवेपन्स म्हणजे जैविक हतीयार बनविण्याची शर्यत लागली आहे आणि याही पुढे जाऊन पुढील युद्ध द्रोणच्या सहाय्याने लढले जात आहे.यामुळे पृथ्वी तहस-नहस होवू शकते.आज संपूर्ण जग उत्पादन वाढविण्यासाठी जैविक खतांचा मोठ्या प्रमाणात वापर करीत आहेत यामुळे पृथ्वीतील शक्ती व ऑक्सिजनची मात्रा दिवसेंदिवस कमी होतांना दिसते.सध्याच्या परीस्थितीत चिन जैविक हतीयार बनविणारा देश बनलेला आहे.चिन असा देश बनला आहे की तो नेहमीच जैविक हतीयाराचे वेगवेगळे परीक्षण करीत असतो.२०१९ मध्ये चिनने कोरोणा व्हायरसचे परीक्षण करून मानवजातीसोबत खुनी तांडव केल्याचे दिसून आले.आज संपूर्ण जग पृथ्वीला वाचविण्यासाठी प्रयत्न करीत आहे तर चिन पृथ्वीचा सर्वनाश करतांना दिसतो. आज मानवाने जंगल संपत्तीची हत्या केल्यामुळे नदी-नाले,तलाव, विहिरी मोठ्या प्रमाणात आटलेले दीसतात.यामुळे दीवसेंदीवस पृथ्वीच्या तापमानात वाढ होत आहे व हवामानात मोठ्या प्रमाणात बदल झाल्याचे दिसुन येते.त्याचप्रमाणे ग्लोबल वॉर्मिंगमुळे सुध्दा पृथ्वीचे संतुलन डगमगायला लागले आहे.पृथ्वीवरील जंगलसंपदा कमी झाल्यामुळे व छोटे-मोठे तलाव आटल्यामुळे हिंसक पशु व जंगलातील इतर पशू (वाघ,बिबट्या,अस्वल,हरीण,बंदर) यांना जंगलात योग्य आहार व पाणी मिळत नसल्यामुळे शहराकडे धाव घेतांना दीसतात हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे. अशा अनेक कारणांमुळे पृथ्वीचा ह्रास होत आहे व जंगली प्राण्यांचा जिवन धोक्यात आलेले आहे.यावर उपाय शोधण्यासाठी जागतिक स्तरावर अनेक योजना राबविल्या जातात.त्यातुनच १९७० मध्ये विंसकॉन्सिन सीनेटर गेलॉर्ड नेल्सन यांनी २२ एप्रिल हा जागतिक पृथ्वी दीवस साजरा करण्याची संकल्पना साकार केली आणि तेव्हापासून २२ एप्रिल हा जागतिक पृथ्वी दीवस म्हणुन साजरा केल्या जातो. आज जगात २०० हुन अधिक देश आहेत या देशांच्या तुलनेत लोकसंख्येचा विचार केला तर १००० कोटींच्या वर लोकसंख्या आहे.त्यामुळे संपूर्ण देशांनी पृथ्वीला वाचविण्याच्या उद्देशाने २२ एप्रिलला प्रत्येक व्यक्तीने एकतरी झाड लावायला पाहिजे. कारण आपण उघड्या डोळ्यांनी करोना महामारीच्या काळात ऑक्सिजनचा तुटवडा पहाला आहे.परंतु नैसर्गिक ऑक्सिजन टिकवून ठेवण्यासाठी जंगल वाचवीले पाहिजे, वृक्षारोपण केले पाहिजे,ज्यांच्या परीसरात जागा नसेल अशांनी एखाद्या कुंडलीमध्ये तरी झाड लावुन पृथ्वी दीवस साजरा करायला पाहिजे.त्याचप्रमाणे जंगल तोडीमुळे जंगलातील प्राणी शहराकडे भटकतात त्यांच्यासाठी जगातील संपूर्ण देशांनी जंगलामध्ये छोटे-छोटे तलाव बांधुन जंगली प्राण्यांचे प्राण वाचवुन संगोपन करायला हवे.कारण मानवाच्या अनेक चुकांमुळे अनेक जंगली पशु-पक्षी व महत्त्वपूर्ण औषधीयुक्त वृक्ष लुप्त होत आहे.या पृथ्वीतलावर प्रत्येक प्राण्याचे व वृक्षांचे असणे आवश्यक आहे.कारण प्रत्येक पशु-पक्षी एकमेकांवर अवलंबून असतो त्याचप्रमाणे प्रत्येक वृक्ष महत्वाची भुमिका बजावीत असते.जगातील गिधाड हा पक्षी अत्यंत महत्त्वाची भुमिका बजावीत असतो.मेलेल्या प्राण्यांचे मांस खाणे गिधाडांचे काम असते.त्यामुळे अशुद्ध परीसर शुद्ध होतो. परंतु दु:खाची बाब ही की वायुप्रदूषण व जलप्रदूषण यामुळे गिधाडांची संख्या नाहीच्या बरोबरीत दीसते.त्यामुळे पृथ्वीवर मानवजातीचे असने जेवढे महत्त्वाचे आहे तेवढेच जंगलातील संपूर्ण पशु-पक्षी यांचे सुध्दा जिवन तेवढेच महत्त्वाचे आहे. तेव्हाच पृथ्वी सुरक्षीत राहील.मानवजातीने स्वत:च्या स्वार्थापोटी पृथ्वीची राखरांगोळी केली आहे.पुढे चालुन महाभयानक परीणाम सर्वांनाच भोगावे लागतील. आता इजरायल-हमास-इराण संघर्ष, अमेरिका-इराण संघर्ष व रशिया-युक्रेन संघर्ष यामुळे तिसऱ्या महायुद्धाचे संकट पृथ्वीवर ओढवल्याचे दिसून येते.आज मानवजातीने पुर्वेपासुन तर पश्चिम पर्यंत उत्तर पासुन तर दक्षिण पर्यंत,आकाश-पाताळा या संपूर्ण ठीकाणी मोठ्या प्रमाणात प्रदुषणाचे जाळे पसरविले आहे.यामुळे आज पृथ्वी माता सुध्दा भयभीत आणि चिंतेत आहे म्हणूनच आज आपल्याला कृत्रिम ऑक्सिजनची गरज भासत आहे.आज मानवाची रक्षा करण्याकरीता पृथ्वीला वाचविण्याचा संकल्प जगातील संपूर्ण राष्ट्रांनी घ्यायला पाहिजे.आज वृक्षलागवडच पृथ्वीला वाचवु शकते.कारण आज जगात जंगलांचे संगोपन होत नसल्याने मोठ्या प्रमाणात वनवे लागतांना दिसतात व यामुळे मोठ्या प्रमाणात जंगल संपदा नष्ट होत आहे.त्याचप्रमाणे देशात व जगात दिवसेंदिवस आगीच्या सुध्दा घटना मोठ्या प्रमाणात वाढत आहे.याचे मुख्य कारण म्हणजे वाढते तापमान यामुळे पृथ्वीचे संतुलन डगमगत आहे हे नक्की.याला कुठेतरी थांबवायला पाहिजे. वृक्ष लागवडीमुळे पावसाचे पाणी जमीनीमध्ये मुरेल व पावसाचे पाणी सरळ समुद्र किंवा नद्यामध्ये न जाता पृथ्वीच्या पोटात जाईल.यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी वाढण्यास मोठी मदत मिळेल व उष्णतेचे प्रमाण कमी होईल.यामुळे विहीरी, तलाव व नदी-नाले,ओढे नेहमी जलमग्न राहील.आज मानवाने पाण्यासाठी सरळ पाताळात प्रवेश केला आहे.म्हणजेच आज मानवाने पाण्यासाठी जमिच्या आत ७०० फुट खोलवर जाऊन बोरवेलच्या सहाय्याने आपण देवलोकातील (पाताळातील) पाणी शोषीत आहोत.मानवाची जमीनीतील पाण्याची क्षमता फक्त ५० ते ६० फुटांपर्यंत आहे.परंतु मानवाचा अतिरेक हा विध्वंसाकडे किंवा विनाशाकडे न्यायला काहीच वेळ लागणार नाही.कारण मानवाच्या हातात सर्वच काही आहे.परंतु मानवाला अजुन पर्यंत निसर्गावर नियंत्रण ठेवता आले नाही. नैसर्गिक आपदासमोर मानव नेहमी हतबल व अपंग होतांना दिसतो. वनवा लागले, महाप्रलय येणे,हीमकडा कोसळने, उष्णतामान वाढने,भुकंप येणे,सुनामी येणे, ढगफुटी ज्वालामुखीचा उद्रेक ह्या संपूर्ण गोष्टी मानवाने स्वत:हुन ओढवलेल्या आहेत. यामुळे जगात दरवर्षी मोठ्या प्रमाणात जिवीत हाणी व वित्तीय हानी होतांना आपण पहातो.यामुळे आज संपूर्ण जगाने एकत्र येऊन पृथ्वीला वाचविण्याचा संकल्प केला पाहिजे. पृथ्वीला वाचविने म्हणजे महायुध्द जिंकण्यासारखेच आहे हे महायुध्द जिंकण्यासाठी जगातून सर्वच स्तरातुन प्रयत्न व्हावयास पाहिजे.आज संपूर्ण जग कठीण घडीतुन प्रवेश करीत आहे. संपूर्ण मानवजातीपुढे तीन प्रश्न उभे ठाकले आहे एक आहे पृथ्वीचे रक्षण, दुसरे म्हणजे वैश्विक महामारी पासुन सुटका आणि तिसरे म्हणजे तिसऱ्या महायुद्धापासुन जगाला वाचविणे याबाबी तेव्हाच शक्य होवू शकते जेव्हा मानवजात खरी मानुसकी दाखवेल. कारण दीवसेंदीवस समुद्राच्या पाण्याची पातळी वाढुन पृथ्वीवरील जमिनीचा भुभाग कमी-कमी होतांना दिसतो. याकरीता ग्रामीण भागातून शहराकडे येणारा लोंढा थांबवीला पाहीजे व सरकारने शेतीला सर्वतोपरी प्रथम प्राधान्य द्यायला पाहिजे.यामुळे पृथ्वीचे रक्षण होईल व खऱ्याअर्थाने पृथ्वी दीवसमानल्या जाईल.पृथ्वी मानवजाती के लिये मेहमान है, मालक नहीं ही बाब मानवजातीने लक्षात ठेवली पाहिजे व पृथ्वीचे रक्षण केले पाहिजे.सध्याच्या परिस्थितीत पृथ्वीवर तिसऱ्या महायुद्धाचे संकट ओढवतांना दिसत आहे. कारण युक्रेन युद्ध पहाता अमेरिका, रशिया, चीन, उत्तर कोरिया, जापान,इराण,इराक, इजरायल,ब्रिटन एकमेकांच्या विरोधात अनुबॉम्बच्या किंवा अत्याधुनिक मिसाईलच्या धमक्या देतांना दिसतात.यामुळे पृथ्वीचा विनाश केव्हाही होवू शकतो याला ताबडतोब थांबायला हवे.पृथ्वी दिनाच्या निमित्ताने मी सर्वांना आग्रह व विनंती करतो की नैसर्गिक ऑक्सिजन वाढविण्यासाठी जंगल तोड थांबवायला हवी व मोठ्या प्रमाणात वृक्षलागवडीवर भर द्यायला हवा यामुळे गुरांना चारा व सर्वांना शुद्ध हवा आणि शुद्ध ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत मिळेल व पृथ्वी वाचेल. पृथ्वी सुरक्षित तर संपूर्ण जीवसृष्टी सुरक्षित हा मुलमंत्र जगातील संपूर्ण देशांनी जपायला हवा.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# सगळेच सत्ताधारी स्वातंत्र्याचे मारेकरी; १८ जून - काळा दिवस

नकाशात आज दिसतो तसा संपूर्ण भारत देश इंग्रज येण्याआधी कधीच नव्हता. इंग्रजांच्या काळात पहिल्यांदा सर्वांसाठी सारखा भारतीय दंड संहिता हा कायदा अस्तित्वात आला. इंग्रज गेल्यानंतर पाहिले संविधान आले. इंग्रज गेले तेंव्हा भारतात चार दोन नव्हे, पाच शेहुन अधिक संस्थाने होती. त्यांचा कारभार, मनमर्जी चालायचा. राजाचा आदेश हाच कायदा असायचा! ही मोठी अनागोंदी भारतीय संविधानाने संपवली. एकत्र राहण्याची देश भावना, म. गांधींनी निर्माण केली. संविधानाने देशाचा राज्यकारभार सुसूत्र चालावा यासाठी रचना केली व भारतीय नागरिकांना त्यांचे मूलभूत अधिकार (स्वातंत्र्य) सुरक्षित राहील याची हमी दिली! मी ही मोठी ऐतिहासिक घटना मानतो. मी मानतो की भारताच्या मूळ संविधानात शेतकऱ्यांबाबत पक्षपात नव्हता. सर्वांना समान मानले होते.

दुर्दैवाने संविधान लागू झाल्यानंतर अवघ्या दीडच वर्षांनी मूलभूत अधिकारांना सुरक्षित करणाऱ्या या संविधानात पहिली घटना दुरुस्ती करून शेतकऱ्यांचे मूलभूत अधिकार हिरावून घेण्यात आले. अनुच्छेद ३१ ए व बी मध्ये बदल करण्यात आला. त्यातून मूळ संविधानात नसलेले परिशिष्ट नऊ निर्माण करण्यात आले. या परिशिष्टात जे कायदे टाकले जातील त्यांच्या विरोधात न्यायालयात जाता येणार नाही, अशी तजवीज केली. एवढेच नव्हे तर मूलभूत अधिकारांचे हनन होत असले तरी न्यायालय त्याबद्दल भाष्य/ हस्तक्षेप करू शकणार नाही, अशी तरतूद केली. या घटनादुरुस्तीचा (दुरुस्ती कसली हा ते बिघाड होता) मोठा फटका शेतकऱ्यांना बसला. सीलिंग, आवश्यक वस्तू हे शेतकऱ्यांना गुलाम करणारे कायदे केवळ परिशिष्ट ९ मुळे कायम राहिले. आज या परिशिष्टात २८४ कायदे आहेत, त्यापैकी अडीच शे कायदे केवळ शेती आणि शेतकऱ्यांशी निगडित आहेत. परिशिष्ट ९ ने देशाची भारत आणि इंडिया अशी फाळणी केली. त्यानाबतर आलेल्या कायद्यानी शेतकऱ्यांना आत्महत्या करायला भाग पाडले. पाच लाखाहून अधिक शेतकऱ्यांना मरण बोलावून घ्यावे लागले.

अनुच्छेद १३ हे मूलभूत अधिकारांचे सुरक्षा कवच होते. आमच्या घटनाकारांनी ते आवर्जून घटनेत समाविष्ट केले होते. आणीबाणीच्या काळात त्यात दीड ओळीची घटना दुरुस्ती करण्यात आली व ३६८ (घटना दुरुस्तीचे अनुच्छेद) द्वारा केलेल्या घटनादुरुस्तीला वरील बंधन लागू राहणार नाही, अशी दुरुस्ती करून हे अनुच्छेदही निष्प्रभ करण्यात आले.

डावे-उजवे मिळून जे जनता सरकार आले होते, त्यांनी आणीबानीतील इतर काही घटनादुरुस्त्या रद्द केल्या, पण ही रद्द केली नाही. डावे असो की उजवे, सगळे राजकीय पक्ष हे शेतकऱ्यांचे मारेकरी आहेत. देशाच्या नागरिकांच्या स्वातंत्र्याला नख लावणारे आहेत.

इतर कोणापेक्षा सर्जकांना स्वातंत्र्याचे मोल जास्त असते. स्वातंत्र्याचा संकोच सर्जकांना उध्वस्त करून टाकतो. म्हणून माझ्यासारखा माणूस या मुद्द्याला घेऊन अस्वस्थ होतो.

तुम्ही अस्वस्थ असाल तर १८ जून हा दिवस काळा दिवस म्हणून आपण पाळू. मी त्याला शेतकरी पारतंत्र्य दिवस असे नाव दिले आहे. या देशातील नागरिकांचे गेलेले गुलभुत अधिकार पुन्हा प्रस्थापित करण्याचा संकल्प करू.

**अमर हबीब, आंबाजोगाई**
**किसानपुत्र आदिलन**
**मो ८४११९०९९०९**

# राज्यपालांकडून राहुल पांडे यांना राज्य मुख्य माहिती आयुक्त पदाची शपथ

**मुंबई -** राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी ज्येष्ठ पत्रकार राहुल पांडे यांना राज्याच्या मुख्य माहिती आयुक्त पदाची शपथ दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत राजभवन मुंबई येथे झालेल्या एका छोटेखानी शपथविधी समारंभात राज्यपालांनी रवींद्र ठाकरे, प्रकाश इंदलकर व गजानन निमदेव यांना देखील राज्य माहिती आयुक्त पदाची शपथ दिली.

सुरुवातीला राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे तसेच इतर माहिती आयुक्त यांच्या नियुक्तीची अधिसूचना वाचून दाखविली.

शपथविधी सोहळ्याची सुरुवात राष्ट्रगीत व राज्यगीताने झाली तसेच समारोप राष्ट्रगीताने झाला.

शपथविधी सोहळ्याला विधान परिषद सदस्य परिणय फुके, मुख्य सचिव सुजाता सौनिक, प्रधान सचिव तथा माहिती व जनसंपर्क महासंचालक ब्रिजेश सिंह, पत्रकार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

पान १ वरुन

## रखरखत्या उन्हात ...

जे दोषी आहेत त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावीआणि मौजे जैनपूर कोठारा येथील दलित आदिवासी भूमी कास्तकारांना योग्य तो न्याय मिळवून द्यावा.

निराधार योजनेतून निराधारांना मासिक देय अनुदान १५०० ऐवजी तीन हजार रुपये देण्यात यावेत कारण निराधार योजनेत संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय अंध व दिव्यांग निवृत्तीवेतन योजनेचा समावेश आहे यामध्ये सर्व योजनांमध्ये लाभार्थ्यांना १५०० रुपये मासिक देय अनुदान मिळते त्याऐवजी ३००० रुपये मासिक दे अनुदान देण्यात येऊन उत्पन्नाची अट शिथिल करण्यात यावी.

या व इतर मागण्या कायदेशीर संदर्भीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात गांभीर्याने विचार करून प्रशासनास आदेशित करून राज्यात दलित आदिवासी भूमिहीन कास्ट पट्टे नावे करून सातबारा देण्यात यावा व शासकीय पडीत जमिनीवर शेतीसाठी झालेले अतिक्रमण नियमानुकुलित करावे तसेच जनहिताच्या कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी बेकायदेशीर रामनगर येथील सातबारा चौकशी करून न्याय प्रविष्ट प्रकरणातील लाभार्थ्यांना सातबारावर घेण्याचे आदेश देण्यात यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जनआक्रोश आंदोलनाच्या माध्यमातून निवेदन देण्यात आले. यावेळी शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड. भास्करराव मगरे, अण्णासाहेब बाळराज, जय खरात यांच्यासह हजारो भुमिहिन कास्तकरांची उपस्थिती होती.

## अधिकाधिक हिंदूना ...

आहेत. अधिकाधिक हिंदूंना संघटित करणे आवश्यक आहे. अशा कार्यक्रमाच्या माध्यमांतून अधिकाधिक हिंदूंना संघटित करा, असा आशीर्वादही त्यांनी या वेळी दिला.

या वेळी ‘सनातन संस्था’निर्मित श्रीरामाचे सात्त्विक चित्र असलेली मोठी प्रतिमा, तसेच हिंदु जनजागृती समितीने निर्मिलेली ‘हिंदू राष्ट्र आवश्यक क्यो ?’, ‘हिंदू राष्ट्र स्थापना की दिशा’, ‘हिंदू राष्ट्र खंडण एवं आक्षेप’ आणि ‘हलाल जिहाद’ ही हिंदी भाषेतील पुस्तके मुख्यमंत्री श्री. योगी यांना भेट देण्यात आली.

## जिल्ह्यात शस्त्रबंदी ...

काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अधिकारी-कर्मचाऱ्यांना तसेच उपविभागातील पोलिस अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूका, सभा, मोर्चा यांना लागू राहणार नाही, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## सातव्या वेतन ...

येणार असून त्यास राज्यातील प्राथमिक शिक्षक संघ,शिक्षक भरती प्राथमिक शिक्षक समिती या प्रमुख संघटनांनी पाठींबा दिला आहे.तरी राज्यातील सर्व शिक्षक बांधवांनी या लक्षवेधी आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन श्री महेश देशमुख विनोद आरसुळ सुभाष भडांगे, प्रमोद पवार,देवेंद्र बारगजे,मधुकर काकडे के.वाय.सोनवणे,नीलेश सोमवंशी ,संजय जाधव, भास्कर घुगे संदीप ओळेकर,अप्पासाहेब मुळे ,चंद्रकांत हजारे ,रफिक शेख आदींनी केले आहे.

## ए प्लस खेळाडूंमध्ये ...

घोषणेवरून असे वाटत नाही की रोहित शर्मा कुठेही जात आहे.

जूनमध्ये जेव्हा टीम इंडिया पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी इंग्लंडला जाईल, तेव्हा रोहित शर्मा संघाचे नेतृत्वही करताना दिसु शकतो. मात्र, अद्याप संघाची घोषणा झालेली नाही. असे बोलले जाते की केंद्रीय कराराची घोषणा करण्यापूर्वी बीसीसीआयच्या उच्च अधिकाऱ्यांनी रोहित शर्माशी चर्चा केली असले आणि त्याच्या भविष्यातील योजना जाणून घेतल्या असतील. त्यानंतरच त्याला ए प्लस ग्रेड देण्यात आला. जर रोहित कसोटी क्रिकेटमधून निवृत्त होण्याचा विचार करत असता, तर त्याला किमान + ग्रेड मध्ये जागी मिळाली नसती.

रोहित शर्मा किती काळ कसोटी खेळेल हे माहित नाही, परंतु त्याला २०२७ मध्ये होणारा एकदिवसीय वर्ल्ड कप नक्कीच खेळायचा आहे. कारण त्याने आधीच सांगितले आहे की, त्याच्यासाठी खरा वर्ल्ड कप हा एकदिवसीय वर्ल्ड कप आहे, जो त्याला जिंकायचा आहे.

रोहितने आता टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटला अलविदा केला आहे, तो फक्त दोन महिने आयपीएल खेळतो. आता त्याचे लक्ष फक्त एकदिवसीय आणि कसोटी सामन्यांवर असणार आहे. पण, सध्या रोहितचा फॉर्म तसा नाही ज्यासाठी तो ओळखला जातो. अशा परिस्थितीत, इंग्लंड मालिकेदरम्यान तो कशी कामगिरी करतो हे पाहण्यासाठी त्याच्यावर निश्चितच लक्ष ठेवले जाईल.







साडेचारशे वर्षांपूर्वी चे हेमाडपंथी भैरवनाथ चे मंदिर हे श्री क्षत्रिय खोडे या ग्रहस्थानी बांधले असून याच ग्रहस्थानी मंदिराच्या पाठीमागील बाजूस अष्टकोनी आकाराची चिरेबंदी बारव आहे या बारवात दुमजली बांधकाम करण्यात आलेले आहे यामध्ये जाण्यासाठी चिरेबंदी पायऱ्या आहेत असून जमिनीपासून पंधरा फूट अंतरावर दगडाने कोरीव नक्षीकाम केलेले आहे आणि मंदिराच्या दोन्ही बाजूस चिरेबंदी गोलाकार बुरुज आहे मंदिराच्या दोन्ही बाजूस बुरुज आहेत या बुरुजाच्या वरती पन्नास वर्षांपूर्वी टेंबा लावत होते त्यावेळी हे दोन्हीही बुरुज टेंबा लावल्यावर फिरत असत कालांतराने काही कारणास्तव हे बुरुज फिरणे बंद झाले असून आजही ती परंपरा कायम आहे. (छायाचित्र - किरण खानापुरे)

## इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या परदेशी शिक्षण शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी** - शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व पीएचडी अभ्यासक्रमासाठी क्युएस-२०० च्या आतील असलेल्या संस्थेत चालु वर्षात प्रवेश घेतला आहे. अशा ७५ विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी परदेशी शिष्यवृत्ती देण्यात येत असते. तरी संबंधित पात्र विद्यार्थ्यांनी आपला अर्ज संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन आवश्यक कागदपत्रासह दि.१७ मे २०२५ पर्यंत समक्ष अथवा पोस्टाने इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, दुसरा मजला, म्हाडा कमर्शियल कॉम्पलेक्स, येरवडा, पुणे ४११००६ येथे दोन प्रतीत सादर करावा, असे आवाहन सहायक संचालक दत्तात्रय वाघ यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

### पाटोदा जि.प.शाळेत पालक मेळावा

# पालकांच्या सहभागामुळे दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाटोदा येथे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डी.एस.मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली २०२५ चा माता व पालक मेळावा घेण्यात आला. मंचावर प्रशालेचे मुख्याध्यापक प्रकाश टोम्पे, मारोती जोशी, गुणाजी नजान, बाळासाहेब परभने, देविदास मामीलवार यांची प्रमुख उपस्थिती होती. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केल्यानंतर इयत्ता पहिलीचे वर्गशिक्षक गंगाधर वानोळे यांनी पालक मेळाव्याच्या आयोजनाची भूमिका विशद करून विद्यार्थ्यांच्या विकासासाठी शाळेत राबविलेल्या विविध उपक्रमांची माहिती पालकांना देऊन पालकांच्या सहकार्याबद्दल धन्यवाद व्यक्त केले. या उपक्रमांचा विद्यार्थ्यांना फायदा होत असून या जिल्हा परिषद शाळेत मिळत असलेले शिक्षण हे गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार असल्याची प्रतिक्रिया दत्तात्रय मोरे, बाळासाहेब परभने, मारोती जोशी, सुरेश काळे, जीवन वायाळ, सुदाम डोळझाके, योगेश बोराडे, परमेश्वर काळे, गजानन चव्हाळ आदी पालकांनी दिली.

चालू शैक्षणिक वर्षातील गुणवत्तेचा आढावा घेतल्यानंतर पुढील शैक्षणिक वर्षाच्या नियोजनाबाबत चर्चा करून रूपरेषा ठरवली. या वर्षामध्ये शाळेला दिलेल्या विविध देणगीदारांचे प्राथमिक शिक्षक वानोळे यांनी ऋण व्यक्त केले. त्याचबरोबर श्रेया स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ देऊन पालकांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. पीएमश्री जिल्हा परिषद प्रशालेचे मुख्याध्यापक प्रकाश टोम्पे यांनी विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार करण्याची पालकांना विनंती करीत शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.विद्यार्थ्यांच्या हितासाठी शिक्षक आणि पालकांचा संवाद महत्त्वाचा असल्याचे सांगून श्री वानोळे यांच्या शैक्षणिक कार्याची प्रशंशा करित यांचा सत्कार केला. प्राथमिक शिक्षक एस.बी.ठाकूर यांनीही पालकांशी संवाद साधला. अध्यक्षीय समारोपात शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डी. एस.मिसाळ यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर पालकांनी लक्ष देण्याची विनंती केली. विविध मनोरंजनात्मक आणि कृतीयुक्त खेळात पालकांनी सहभागी होऊन मनमुराद आनंद लुटला. उपस्थित सर्व पालकांचे पहिलीचे वर्ग शिक्षक गंगाधर वानोळे यांनी आभार मानले. मेळावा यशस्वीतेसाठी गीता बरसाले, देविदास मामीलवार, गंगाधर वानोळे यांच्यासह विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.




भाजपाच्या परतुर तालुका अध्यक्षपदी शत्रुघ्न कणसे, मंठा तालुकाध्यक्षपदी नितीन राठोड तर जालना ग्रामीणच्या तालुकाध्यक्षपदी विक्रम उफाड यांची नियुक्ती

# भारतीय जनता पार्टीला समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करा - आमदार बबनराव लोणीकर

**परतूर । प्रतिनिधी -** भारतीय जनता पार्टी हा सर्व सामान्य जनतेचा पक्ष असून सबका विकास सबका विश्वास सबका प्रयास हे ब्रीद घेऊन काम करणारा पक्ष आहे. देशात २०१४, २०१९ आणि २०२४ साली या पक्षाला सत्तास्थापनेची संधी मिळाली. मात्र गेल्या दोन लोकसभा निवडणुकीच्या (२०१४, २०१९) तुलनेत भाजपाला २०२४ साली स्वबळावर बहुमताचा आकडा गाठता आला नाही. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपा प्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीला केवळ २९३ जागांवरच समाधान मानावे लागले. यात भाजपाचा वाटा २४० इतका आहे. २०१४ मध्ये २८२ आणि २०१९ मध्ये ३०३ जागा जिंकत स्वबळावर बहुमताचा आकडा भाजपाने पार केला होता. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत विरोधी पक्षांच्या इंडि आघाडीने भाजपासमोर फेक नरेटीव्ह च्या माध्यमातून मोठे आव्हान उभे केले होते. परिणामी भाजपाला उत्तरप्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटक, पश्चिम बंगाल, राजस्थान या ठिकाणी भाजपाला थोडाफार फटका बसला. परंतु भारतीय जनता पार्टी पुन्हा एकदा सत्तेत आलो असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी आज केले.

भारतीय जनता पार्टीच्या परतुर मंठा व जालना ग्रामीण या तीन मंडळाच्या तालुकाध्यक्ष पदाची निवड आज करण्यात आली. यावेळी भारतीय जनता पक्षाच्या परतुर तालुका अध्यक्षपदी शत्रुघ्न सदाशिवराव कणसे यांची तर छायाताई गोरबांड यांची महिला आघाडी तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली तर मंठा तालुका अध्यक्षपदी नितीन उत्तमराव राठोड तर जालना ग्रामीणच्या तालुकाध्यक्षपदी विक्रम हनुमंतराव उफाड यांचे नियुक्ती करण्यात आली. प्रसंगी मंठा तालुका भारतीय जनता युवा मोर्चा तालुकाध्यक्षपदी आनंद दौलतराव जाधव तसेच सरपंच परिषदेच्या मंठा तालुकाध्यक्षपदी अमोल गणेशराव मोरे यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी पदाधिकाऱ्यांना संबोधित करताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की भारतीय जनता पक्ष हा सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा पक्ष असून तो समाजाच्या शेवटच्या घटकातून पर्यंत पोहोचवण्यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत.

पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की, १९५१ साली श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी भारतीय जनसंघाची स्थापना केली होती. जनसंघ हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे राजकीय अंग मानले जात असे. काँग्रेस व तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्याकडून पाकिस्तानचे होणारे लांगूलचालन रोखणे व भारतामधील हिंदूंचे हित जपणे ही जनसंघाची उद्दिष्टे होती. स्थापनेनंतर जम्मू आणि काश्मीर भारतामध्ये संपूर्ण सामावून घेतला जावा अशी आग्रही भूमिका जनसंघाने घेतली व या दरम्यान आंदोलन करताना अटक झालेल्या मुखर्जी यांचे काश्मीरच्या तुरुंगातच निधन झाले. दीनदयाल उपाध्याय व त्यानंतर अटलबिहारी वाजपेयी व लालकृष्ण अडवाणी या तरुण नेत्यांनी जनसंघाची सूत्रे हातात घेतली. १९५२ सालच्या पहिल्या लोकसभा निवडणुकीमध्ये जनसंघाला केवळ २ जागांवर विजय मिळाला होता. त्यावेळी भारतीय जनता पक्षाला दोन खासदार असण्यावरून हिणवले तोच भारतीय जनता पक्ष संघटन सातत्य आणि निश्चयाच्य बळावर ३ वेळा केंद्रात सरकार स्थापन करण्यात यशस्वी ठरला.

यावेळी भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर अंकुशराव आवचार बाबुराव शहाणे गणेशराव खवणे सतीशराव निर्वळ राजेश मोरे कैलास बोराडे पंजाबराव बोराडे वैजनाथ बोराडे दीपक बोराडे ज्ञानेश्वर शेजुळ जिजाबाई जाधव विकास पालवे नागेशराव घारे गजानन देशमुख नितीन सरकटे शरद पालवे रामकिसन बोडखे प्रसाद राव बोराडे शेषनारायण दवणे राजूभाऊ खराबे जगनराव टकले दत्ताराव कांगणे गणेशराव चव्हाळ बंडू नाना खरात वसंत बागल सुभाष बागल माऊली गोंडगे संतोष बोराडे शरद मोरे अनिल



चव्हाण तानाजी शेंडगे सोनाजी जाधव बाळू काळे श्रीराम जाधव शिव शंकर डोईफोडे शिवाजीराव थोरवे विजय घाडगे गोविंद खरात विनोद राठोड जालिंदर राठोड रामेश्वर काकडे प्रमोद भालेकर सौरभ माहोरकर कोमल कुचेरिया विष्णू गायकवाड गौतम खरात सोपान वायाळ रमेश वायाळ बाळासाहेब तौर कपिल तिवारी विनोद गायकवाड

परतुर तालुक्यातील रमेशराव भापकर , संपत टकले, भगवानराव मोरे श्रीरंग जईद संभाजी वारे बद्रीनारायण ढवळे, सुरेश सोळंके, शिवाजी पाईकराव, रवींद्र सोळंके गजानन लोणीकर परमेश्वरा अकात बंडू मानवतकर सुधाकर बेरगुडे. विष्णू शहाणी माणिकराव वाघमारे, सिद्धेश्वर केकान, प्रदीप ढवळे दादाभाऊ तो र उद्धव गुंजाळ , संदीप तनपुरे भगवान आरडे केडी भदर्गे रामजी कोरडे, नदीम शेख गोपाल गोरे मीराज खतीब पद्माकर कवडे कृष्णा मोठे , परतूर शहरातील दया काटे प्रवीण सा तो नकर संदीप बाहेकर प्रकाश चव्हाण, कृष्णा आरगडे यांच्यासह कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# जाफराबाद शिर्डी व पंढरपूर बस सेवा सुरु करण्याची मागणी

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** जाफराबाद आगारातून जाफराबाद शिर्डी व जाफराबाद पंढरपूर या लांब पल्ल्याच्या बस सेवा सुरू कराव्यात अशी मागणी येथील मानव सेवा मंडळातर्फे करण्यात आली आहे. याबाबत आगार प्रमुख रंजीत राजपूत यांना दिलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे की आगार झाल्यानंतर जाफराबाद शिर्डी ही बस सेवा कायम सुरू होती. मात्र कोरोना काळापासून ही बस सेवा बंद करण्यात आली आहे. दरम्यान शिर्डी येथे अनेक जण दर्शनासोबतच उपचारासाठी देखील रुग्णालयात जात असतात. त्यामुळे ही बस सेवा जाफराबाद, टेंभुर्णी, राजुर, खुलताबाद, वेरूळ या मार्गे सुरू करावी अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय परिसरातून पंढरपूर येथे जाणारा मोठा भाविक वर्ग आहे. त्यामुळे जाफराबाद- पंढरपूर ही लांब पल्ल्याची बस सेवा देखील सुरू करावी अशी मागणीही मंडळाने केली आहे. यावेळी आगारप्रमुख रंजीत राजपूत यांनी या मागणीचा विचार करून लवकरच या दोन्ही बस सेवेसोबत जाफराबाद अक्कलकोट ही बस सेवा ही सुरू करण्याचा मानस असल्याचे सांगितले. दरम्यान या दोन्ही लांब पल्ल्याच्या बस सेवा आगाराला चांगला गल्ला मिळवून देणाऱ्या असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. निवेदनावर मानस सेवा मंडळाचे संजय राऊत, अलकेश सोमानी, दत्तू मुनेमानिक, संतोष शिंदे, नसीम शेख, बालाजी मगर, गजानन डोमळे, रमेश साळवे, कैलास देशमुख, सुरेश बोर्डे, संजय निकम आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



## टाटा पॅशिओ- दुचाकी अपघात; पती-पत्नी जागीच ठार

**मंठा । प्रतिनिधी -** वाटुर फाटा ते देवगाव फाटा मार्ग बनला मृत्यूचे आगार या २४ कि.मी अंतरावर एक वर्षांमध्ये तब्बल मृत्यूचा आकडा हा तीन अंकांमध्ये गेला असून जोगवाडा तालुका जिंतूर येथील दांपत्य अंकुश रामराव तुरे वय वर्ष ४५ आणि अरुणा अंकुश तुरे वय वर्ष ३८ लग्न समारंभ आठपून आजीला मंठा येथे सोडून रामनगर जवळील माळेगावला नातेवाईकाला भेटण्यासाठी जात असताना मंठा तालुक्यातील केंधळी पाटीवर टाटा पॅशीओ दुचाकी यांची धडक समोरासमोर होऊन पती-पत्नी यांचा जागीच मृत्यू झाला आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.